**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**समाज विकास विभाग**
**मुख्य प्रशासकीय इमारत, तळमजला, पिंपरी १८**

## समुह संघटक या पदावर मानधनावर हंगामी नेमणुकीबाबत
**जाहिरात प्रकटन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागा अंतर्गत अस्थायी पदावर एकुण ०५ समुह संघटकांची सेवा ०६ महिने कालावधीसाठी एकवट मानधनावर घ्यावयाची असल्यने अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदाचे आरक्षण, अर्जाचा नमुना, शैक्षणिक अर्हता, अनुभव, सदर पद भरतीसाठी आवश्यक त्या अटी व शर्ती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर नोकरभरती (recruitment) या सदरामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

नमुद केलेली शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या व अनुभवधारक उमेदवारांनी आपले अर्ज **पिंपरी चिंचवड महानगरपालिका, समाज विकास विभाग,मुख्य प्रशासकीय इमारत, तळमजला, पिंपरी, पुणे ४११०१८** या पत्त्यावर दि.08/06/2022 पर्यंत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पोहोचतील अशा पध्दतीने पाठविण्यात यावेत. विहीत नमुन्यातील अर्जासोबत सर्व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडण्यात याव्यात.

सही/-
अति. आयुक्त (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

जाहिरात क्र. ४२

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**समाज विकास विभाग**

## मुख्य प्रशासकीय इमारत, तळमजला, पिंपरी १८

### समुह संघटक या पदावर मानधनावर हंगामी नेमणुकीबाबत

### जाहिरात प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाअंतर्गत खाली नमूद केलेल्या आरक्षणानुसार एकुण ०५ समुह संघटकांची सेवा ०६ महिने कालावधीसाठी एकवट मानधनावर घ्यावयाची असल्याने, अनुभवधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदनाम. | भज क | ई डब्ल्यु एस | खुला अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|
| समुह संघटक | ०१ | ०२ | ०२ | ०५ |

**अटी व शर्ती :-**

१) वरील पदावरील नेमणुका, शैक्षणिक पात्रता, शासकीय व निमशासकीय विभागाकडे काम केल्याचा अनुभव व समाज विकास विभागाकडील कामाचा अनुभव इ. च्या आधारे परिक्षण करुन व गुणवत्ता तक्त्यानुसार निवड व प्रतिक्षा यादी तयार करुन ०६ महिने कालावधीकरीता दरमहा एकवट मानधनावर करार पध्दतीने नेमणुक करण्यात येईल.

२) समुह संघटक जागांसाठी शारिरीक दृष्ट्या सक्षम असणारे व यापूर्वी पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागाकडे कामकाजाचा अनुभव असलेल्या उमेदवारांसाठी वय वर्षे ५० पर्यंत व इतर उमेदवारांना शासन निर्णयानुसार खुल्या वर्गासाठी वयोमर्यादा ३८ वर्षे इतकी असून, मागासवर्गीय उमेदवारांचे बाबतीत सदर वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील.

३) समुह संघटक पदासाठी एम. एस. डब्ल्यू तसेच वस्तीपातळीवरील कामाचा किमान १ वर्षाचा अनुभव तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागाकडील किमान १ वर्षाचा अनुभव असणा-यास प्राधान्य.

४) अर्ज करताना उमेदवारांनी जन्म तारखेच्या पुराव्यासाठी जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला अथवा जन्म तारखेची नोंद असलेली शालांत परिक्षेच्या उत्तीर्ण प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

५) अर्जदार महिला विवाहीत असल्यास, शासनमान्य विवाह नोंदणी प्रमाणपत्राची अथवा शासनमान्य गॅझेटची (राजपत्र) स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

६) अर्जदाराने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द केलेला विहीत नमुन्यातील अर्ज सुवाच्च हस्ताक्षरात भरून, स्वत:चा नव्याने काढलेला पासपोर्ट साईजचा फोटो, आधारकार्ड, वयाचा पुरावा, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र, अनुभवाचा पुरावा इ. सर्व कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागात पोस्टाद्वारे अथवा समक्ष दि. ०८/०६/२०२२ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पोहोच होतील अशा पद्धतीने पाठवावेत.

सदर तारखेनंतर उशीरा येणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही अथवा त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही तसेच पत्रव्यवहार केला जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी

७) प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून उमेदवारांची पात्रता यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर www.pcmcindia.gov.in प्रसिद्ध करणेत येईल.

८) अर्जांमध्ये संपूर्ण माहिती दिलेली नसल्यास तसेच अर्जासोबत उपरोक्त नमूद दाखल्याच्या प्रती जोडलेल्या नसल्यास सदरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत. अर्जासोबत दिलेली माहिती व मुळ कागदपत्रात काही दोष आढळल्यास अशा नेमणुका बाद करण्यात येतील.

९) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा.

१०) निवड प्रक्रीयेचे अंतिम अधिकार मा.अतिरिक्त आयुक्त (२), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ यांनी राखून ठेवलेले आहेत.

११) अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) सदर नियुक्त्या मानधन तत्वावर होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना प्रति महा र. रु. २५८९५/- इतके मानधन अदा केले जाईल. तसेच त्यांना मनपाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायम स्वरुपी नियुक्ती करीता हक्क सांगता येणार नाही व मनपा कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळण्यास ते पात्र ठरणार नाहीत.

१३) वरील पदांसाठी कामाचे स्वरुप ठरविण्याचे अधिकार मा. विभाग प्रमुख यांना राहतील.

१४) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार अर्हता धारण न करणारा आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास उमेदवारी रद्दबातल केली जाईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

तरी इच्छुक उमेदवारांनी दि. ०८/०६/२०२२ पर्यंत विहीत नमुन्यातील अर्ज व अनुषंगिक कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह पिंपरी चिंचवड महानगरपालिका, समाज विकास विभाग, मुंबई – पुणे रस्ता, पिंपरी – ४११०१८. येथे पोहोच होतील अशा पद्धतीने पाठवावेत.

सही/-
(जितेंद्र वाघ)
अतिरिक्त आयुक्त (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८

जाहिरात क्र. ४२ /२०२२
क्र. नावियो/१/कावि/३४१/२०२२
दिनांक २४/०५/२०२२

सही/-
(अजय चारठाणकर)
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

# <u>अर्ज नमुना</u>

पासपोर्ट
आकाराचा
फोटो

प्रति,

मा. उप आयुक्त
समाज विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.

यांचेकडे सविनय सादर.

**विषय – मानधन तत्वावर तात्पुत्या स्वरूपात “समुह संघटक” या पदावर सेवेत घेणेबाबतचा अर्ज...**

**संदर्भ –** दिनांक / /२०२२ रोजीच्या--------------------- या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेली जाहिरात क्र. ४२/२०२२

महोदय,

संदर्भिय जाहिरातीनुसार मी “समुहसंघटक” या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असून या पदासाठी मानधन पध्दतीने निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

(आडनाव) (स्वत:चे नाव) (वडिलांचे/पतीचे नाव)

१. संपूर्ण नाव : ----------------------------------------------------------------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) : ---------------------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------------------------------------------------------

३. मोबाईल नं. ----------------------------------------------------------------------------------------------------

४. जन्मतारीख : --------/-------/---------- (DD/MM/YY) ५. लिंग : स्त्री / पुरूष

६. जात: ---------------------------- ☐ ☐ ☐ ☐ ☐

७. जात (प्रवर्ग) नमूद करावा : √ अशी खूण करावी.

| अजा | अज | विजा अ | भज ब | भज क | भज ड | विमाप्र | इमाव | ईडब्ल्युआरएस | अराखीव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

८. अ. शैक्षणिक पात्रता :

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | शाळा / महाविद्यालयाचे नाव | बोर्ड / विद्यापीठाचे नाव | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इ.१०वी | | | | |
| २. | इ.१२वी | | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | पदवी | | | | |
| ४. | पदव्युत्तर पदवी (MSW) | | | | |

ब. संगणक कौशल्य पात्रता :-

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | संस्थेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |

९. पिंपरी चिंचवड महानगरपालिका, समाज विकास विभागाकडे काम केले असल्यास अनुभव :-

अ. पदनाम : ------------------------------------------ ब. कालावधी : ----------------------------------------

क. कामाचे स्वरुप : ----------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------- (सोबत अनुभव प्रमाणपत्र / कामाचा आदेश प्रत जोडणे आवश्यक)

१०. इतर शासकीय / निमशासकीय संस्थेकडील अनुभव :- अ) पदनाम : ----------------------------------------

ब) कालावधी : ---------------------------------- क) कामाचे स्वरुप : ---------------------------------------

--------------------------------------------------------(सोबत अनुभव प्रमाणपत्र / कामाचा आदेश प्रत जोडणे आवश्यक) -

(अर्जातील माहिती व सोबत जोडलेली कागदपत्रे चुकीची आढळल्यास माझा अर्ज रद्द करणेत यावा.)

अर्जदार नाव : ---------------------------------------------- अर्जदार स्वाक्षरी : ---------------------------------

दिनांक : ------------------------------

अर्ज तपासला – स्वाक्षरी ------------------- दिनांक --------------------- नाव : ------------------------------------

सही/-

अति. आयुक्त (२)

पिंपरी चिंचवड महानगपालिका

पिंपरी - १८